स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

**शासकीय दंत महा‍ि द्यालय व रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर**

GOVT. DENTAL CO LEGE & HOSPITAL,CH. SAMBHAJINAGAR

पत्ता : धन्वंतरीनगर घाटी परिसर, **छत्रपती संभाजीनगर** – 431 001

दुरध्वनी क्र.(०२४०) २४०२३८१/८२/८३ संके स्थळ-www.gdchcsn.ac.in ईमेल-gdca८३@yahoo.com

जा.क्र.शादंमरुछसं/आस्था-राजप/पदभरती/सहा.प्राध्या क/5479-81/२५ दि. 27 OCT 2025

# जाहिरात

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णा य, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील खालील नमुद विविध विषयातील सहाय्यक प्राध्यापक पदे निव्वळ ता पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने (pure contractual basis) ३६४ दिवसांकरिता ठोक मानधन तत्त्वावर भरण्याकरि ा पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**तात्पुरत्या स्वरुपा भरावयाच्या रिक्त पदांचा तपशिल**

| अ.क्र. | पदनाम व विष चे नाव | भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक, सामाजिकदंतशा | ०२ |

**अर्ज सादर करण्याची पद्धत व वेळापत्रक :**

| | |
|---|---|
| अर्ज मिळण्याचे व परिपुर्ण भरलेले अर्ज | मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर ४३१००१ |
| अर्ज जमा करण्याचे ठिकाण | आवक-जावक विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर |
| अर्ज मिळण्याचा व जमा करण्याचा कालावधी | दि. ३०/१०/२०२५ ते दि. ०७/११/२०२५ रोजी सायंकाळी ०५ : ०० वाजेपर्यंत ( सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून ) |
| अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख | दि.०७/११/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत |
| पात्र उमेदवारांच्या मुलाखतीसाठी यादी प्रसिद्ध करण्याची तारीख व ठिकाण | दि.११/११/ २०२५ रोजी सायंकाळी ०५:३० वा. सूचनाफलक, शा.दं.म.व रु. छत्रपती संभाजीनगर |
| मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण | दि.१३/११/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर |

१. परिपुर्ण भरलेले अर्ज ऑफलाईन पद्धती आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह विहित कालावधीत सादर करावेत, टपालाने सादर केलेले अ र्ज स्विकृत केले जाणार नाहीत.

२. जाहिरातीस अनुसरुन विहित निक /पात्रता तसेच अर्जामधील दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्र ो अर्जासोबत जोडाव्यात.

**मुलाखतीसंदर्भात सर्वसाधारण सूचना :**

१. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना ठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी सूचनाफलकावरील यादीचे अ लोकन करुन उपस्थित रहावे.

२. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी ु लाखतीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.

३. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल त्याकरिता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.
४. पात्र उमेदवारांच्या मुलाखती मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या दालनात घेण्यात येतील.

**सहाय्यक प्राध्यापक या पदाकरिता सर्वसाधारण पात्रता :**

उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

**वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास /walk in interview पर्यंत ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांकरिता उच्च वयोमर्यादा पाच वर्ष शिथिलक्षम राहील.

**सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता ( दंत विषय - अ.क्र.१ ते ९ मध्ये नमुद पदे ) :**

१. उमेदवाराने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस.) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी. तसेच भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेली असावी.
२. उमेदवार डेन्टिस्ट ॲक्ट -१९४८ नुसार नोंदणीकृत असावा. तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणीकृत असावा.

**सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता ( वैद्यकीय विषय - अ.क्र.१० मध्ये नमुद पद ) :**

१. उमेदवाराने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग किंवा भारतीय दंत परिषदेच्या मानंकानुसार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ( M.D. Biochemistry or Equivalent Qualification as per NMC ) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी.
२. उमेदवार राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग व महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद यांचेकडे नोंदणीकृत असावा

**सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता शैक्षणिक पात्रता ( वैद्यकीय विषय - अ.क्र.१० मध्ये नमुद पद ) :**

१. उमेदवाराने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग किंवा भारतीय दंत परिषदेच्या मानंकानुसार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी ( M.D. Biochemistry or Equivalent Qualification as per NMC/DCI ) अर्हता किंवा त्यास समकक्ष अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठातून धारण केलेली असावी.

**निवडीची कार्यपद्धती :**

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी भारतीय दंत परिषद व राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानंकानुसार अर्हता धारण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांची गुणानुक्रमानुसार निवड करण्यात येईल व नंतर इतर उमेदवारांची गुणानुक्रमानुसार रिक्त पदावर निवड करण्यात येईल. उमेदवारांची निवड गुणानुक्रमे व एम.डी.एस./एम.डी./एम.एस. उत्तीर्ण होण्यासाठीचे प्रयत्न (NO. OF ATTEMPTS) विचारात घेऊन करण्यात येईल.

**मानधन :**

सहाय्यक प्राध्यापक पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त ) इतके ठोक मानधन अनुज्ञेय असेल. सदर मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते वा आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.

**अटी व शर्ती :**

१. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे आगोदर घडेल इतका राहील. या कालावधीमध्ये बंधपत्रित उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/निवड मंडळ पुरस्कृत नामनिर्देशनाने/बदलीने/नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.
२. उमेदवार संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. निवडीनंतर वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्याचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

३. उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गातील असल्यास जातीच्या दाखल्याची पडताळणी करणे बंधनकारक असेल.

४. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

५. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापक, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

६. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. सदरील नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

७. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.

८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

९. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. ९

१०. उमेदवाराच्या कामकाजाचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित विभाग प्रमुखांनी दर तीन महिन्यांनी उमेदवाराच्या कामकाजाचा तपशीलवार आढावा स्वत:च्या अभिप्रायासह अधिष्ठाता यांना सादर करावा. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास तात्काळ प्रभावाने नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

११. सदरील जाहिरातीत अंशत: अथवा पुर्णत: बदल करण्याचे अथवा जाहिरात रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरितांनी राखून ठेवेलेले आहेत.

१२. अर्जदाराने निवडप्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१३. सदरील जाहिरातीमधील रिक्त पदे, शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, मानधन, निवडीची कार्यपद्धती, अटी व शर्ती व अन्य बाबी ह्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार लागु राहतील.

(डॉ.मा.स.इंदुरकर)
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रति : सूचनाफलक, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

प्रत : १.मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव/मुंबई/नागपुर यांना विनंती करण्यात येते की, सदरील जाहिरात आपल्या संस्थेच्या सुचनाफलकावर प्रसिद्ध करण्यात यावी.